**प्रेस नोट दि.१६/०७/२०१९**
**वानवडी पो स्टे पुणे शहर**
**रिक्षा मध्ये विसलेला मोबाईल परत केले बाबत.**

इसम नामे अल्तमश वहिद भोरे यांनी त्यांचा ३८,०००/- किंमतीचा वन प्लस कंपनीचा मोबाईल दि.०१/०७/२०१९ रोजी सायंकाळी ०७.०० वा. चे सुमारास लुल्लानगर ते जगताप चौक दरम्यान रिक्षामध्ये विसरला असल्याने ऑनलाईन गहाळ मालमत्ता तक्रार दिलेली आहे. त्यानुसार वानवडी पो. स्टे. चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, क्रांतीकुमार पाटील यांनी वानवडी पो.स्टे.चे पोशि प्रतिक लाहिगुडे यांना सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहुन सदर रिक्षाचा शोध घेणेस सांगीतले त्यानुसार लाहिगुडे यांनी लुल्लानगर ते जगताप चौक फातीमानगर येथील सर्व सी.सी.टी.व्ही फुटेज घेऊन ती पाहिली असता त्यांना फिर्यादीने वर्णन केलेली रिक्षा लुल्लानगर येथील सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्यामध्ये दिसून आल्याने त्यांनी सदर रिक्षामालकाचा शोध घेऊन सदर रिक्षाचा नंबर एम.एच.१२ क्यु.आर.५९२१ असून त्याचे मालकाचे नाव फय्यज बागवान असे असल्याचे समजले. त्यानुसार पोलीस शिपाई लाहिगुडे यांनी त्यांचेकडे गहाळ झालेल्या मोबाईल बाबत चौकशी केली असता त्यांना तो मोबाईल रिक्षामध्ये सापडल्याचे सांगीतले. सदरचा मोबाईल लाहिगुडे यांनी ताब्यात घेऊन तक्रारदार यांना सुपुर्त केला आहे. त्यावेळी त्यांनी पोलीस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील व पो.शि. लाहिगुडे यांचे आभार मानले.